ABHIJAAT

# Abhijaat

COEP'S OFFICIAL NEWSLETTER
NOVEMBER 2017

The Genesis of a legacy



Editor in chief -
Ambarish Patki
Designer -
Sai Karkhanis

## सी ओ ई पी cultural ची विजयी परंपरा कायम

दरवर्षीच आपल्या दर्जेदार कलाकृतींच्या जोरावर विविध प्रतिष्ठीत स्पर्धा गाजवणाऱ्या सी ओ ई पी cultural ने या वर्षीदेखील आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. नेहमीच सुंदर कलाकृतींनी रसिकप्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आपल्या महाविद्यालयाच्या संघाने याही वेळी अनेक स्पर्धा गाजवल्या. विविध स्पर्धांमध्ये वैयक्तिक आणि सांघिक अशा दोन्ही प्रकारांत सी ओ ई पी cultural ने बक्षिसांची अक्षरश: लयलूट केली. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील सी ओ ई पी cultural ने संपादित केलेले यश खालील प्रमाणे:

१. भरत करंडक २०१७
अभिजीत आहेर - अभिनय उत्तेजनार्थ
२. गाडगीळ करंडक २०१७
सर्वोत्कृष्ट अभिनेता उत्तेजनार्थ - अभिजीत आहेर
सर्वोत्कृष्ट अभिनेत्री उत्तेजनार्थ - शरयु बनकर
सर्वोत्कृष्ट संहिता उत्तेजनार्थ - शुभंकर पडवळ
३. सरपोतदार करंडक २०१७
सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन उत्तेजनार्थ - पीयूष गिरगांवकर
सर्वोत्कृष्ट अभिनेता उत्तेजनार्थ - अभिजीत आहेर
सर्वोत्कृष्ट अभिनेत्री उत्तेजनार्थ - सायली साळुंके
४. मल्हार २०१७ ( सेंट झेवियर्स महाविद्यालय,मुंबई)
पथनाट्य स्पर्धा( Streetplay Competition)
द्वितीय पारितोषिक विजेते.

अथक मेहनत घेऊन COEP च्या शिरावर मानाचा तुरा खोवणाऱ्या सर्व विजेत्यांचे अभिजात परिवाराच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

-पीयूष गिरगांवकर

## COEP Tales




## MindSpark : A Giant Leap towards Techno-Utopia

MindSpark, the national level, annual tech-fest of COEP was in the centre of everyone's mind in the month of September, while the preparations and activities had already taken a surge in the beginning of the semester. The college was all geared-up for hosting its techno-bonanza once again, that would mark its 11th edition. The event saw a whooping footfall of more than 20k students through out the state. During the 3 days of the fest from 22nd to 24th of September, the college campus had probably become the most happening pocket of the city. **The whole of campus was flooded with students. Their extreme enthusiasm and** zeal to show their mettle had energized the campus fervently. There was eagerness in their eyes, swiftness in their bodylanguage and rush in their breath. Everything in those 3 days symbolized the prolific and high energies of youth. They were unleashed to build, excel, innovate and transform.

MindSpark'17 recieved the patronage of distinguished organisations and undertakings of Make in India, Start-up India, Digital India and UNESCO.MindSpark, this year also celebrated their Paakhi-a social initiative for women and girl child empowerment. Under this venture, 70 women of the socially deprived sections were taught skills that would make them independent by yielding them jobs. Over the past 10 years, MindSpark has grown from strength to strength and has come up with a distinct flavour that would set the benchmark high each time. **One of the main ideas of MindSpark is being devoted to a theme and designing** events in line with the theme. Considering the growing dependance of humans on technology for smallest of tasks, and the adverse effect of the soaring technologies on the environment, the theme this year was "Towards Techno-Utopia". The objects of the events and competitions ran parallel with this relevant and contemporary theme. There were 50+ events classified under 12 distinct portfolios pertaining to every branch of engineering like mechtrix related to mechanical, circuit fixer 1 and 2 related to electrical,etc. Some events were there to explore gaming skills also like Lanslam. The events were also supplemented by engineering workshops where ent
husiasts were exposed to various ideas and were taught different skills. There was much of idea-sharing in them too. The workshops saw a great response and were successful in what they had set out to achieve. One of the key features of MindSpark'17 was the hackathon. It was Pune's largest student organised 24-hour hackathon.

The whole of the organising team of MindSpark comprised of 10 different portfolios of work related to different necessities. The students who had volunteered to organise the event worked in these portfolios. Each team working and contributing to the fest through their sector of work to make the event a grand succes! After the event the 24 heads were elated to see how their sleepless nights of work became!

Moving towards non-technical events, each day brought a voluptious event to charm the crowd at the end of the day. Be it the ecstatic music concert performed by The Local Train, or the hilarious but naughty stand-up comedy by AbhishekUpmanyu, or the prolific laser show; they set the tempo of MindSpark'17 high! MindSpark also hosted 4 keynote lectures rendered by MedhaPatkar, an activist known for her contribution to the "Narmada BachaoAndolan", Prof. K N Ganesh, the Director of IISER Pune, Mr.SonamWangchuk- an inventer and inspiration for all,Dr. Rajendra Singh the waterman of India and Dr. R Chidambaram on topics of contemporary concerns.-This year was a year of firsts - with Genius Junior being held in more than 10 different cities, indikya an event which was held in different cities across India and predict x an all India online event. With our college having it's first ever comedy night to having the decor in AC for the first time. This year's teams have definitely set standards and new records.

AISSMS college emerged as the victor of the award of championship and were gracefully awarded the trophy during the prize distribution ceremony.AsCOEPians, we are blessed to experience and organise an event as innovative as MindSpark. The event has created indelible memories and impressions in our hearts. Every COEPian looks forward to MindSpark'18 where again, the fest will beat its own records and push the boundaries of innovation and excellence!




-Srirang Sohoni

## जाणीव क्लबतर्फे व्याख्यानमालेचे आयोजन

सी. ओ. ई. पी. जाणीव क्लब तर्फे ४ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर दरम्यान व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. सादर व्याख्यानमालेत वक्त्यांनी सामाजिक व राजकीय विषयांवर आपली मते मांडली. पहिल्या दिवशी आयसर, पुणे येथील प्राध्यापक आणि 'लोकसंख्या व उत्क्रांती' याचे अभ्यासक श्री. सुरीथ देय यांनी '२१ व्या शतकातील उत्क्रांती' या विषयावर इंग्रजी भाषेतून आपले विचार मांडले.
दुसऱ्या दिवशी सामाजिक कार्यकर्ते आणि अर्थतज्ज्ञ श्री. नीरज जैन यांनी 'नोटबंदी' बाबत आपल्या वक्तृत्वातून सरकारच्या निर्णयातील चुका आणि भारतीय अनौपचारिक अर्थव्यवस्था, याबाबत आपले विचार मांडले. त्याचप्रमाणे सरकारने कोणत्या अर्थविषयक प्रश्नांना प्राधान्य द्यावे, याबाबतही त्यांनी भाष्य केले. सदर व्याख्यान हिंदी भाषेतून होते.
व्याख्यानमालेच्या तिसऱ्या दिवशी, मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष श्री. शमशुद्दीन तांबोळी यांनी 'समान नागरी कायदा' या विषयावर मराठी भाषेतून आपले मत मांडले. इंग्रजांनी लागू केलेला 'मुस्लीम मॅरेज ॲक्ट' ते आतापर्यंतच्या 'तीन तलाक' च्या घटनेपर्यंत, त्यांनी संपूर्ण इतिहास श्रोत्यांसमोर मांडला. तीन तलाकच्या बंदीला मुस्लीम समाजातूनच होणारा विरोध आणि पर्यायाने सरकारची या बाबतीतील नाराजी यावर त्यांनी प्रकाश टाकला.

आलेल्या सर्व वक्त्यांनी कार्यक्रमांनंतर श्रोत्यांच्या शंकांचे निरसन केले. स्पर्धापरीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची विशेष उपस्थिती दिसून आली. ६ ऑक्टोबरला आभारप्रदर्शनाने व्याख्यानमालेची सांगता करणायत आली.

-मंदार भानुवंशे

## TRAILER is Out !!

REGATTA! the annual Boat festival proudly organized by CoEP students, a sui generis, which truly makes CoEP stand out from the crowd. Every Year Regatta is carried out in odd semesters typically in the month of March. So to unveil what our Boat Club stands for, to impress the real zest of Regatta ,'Mini Regatta' was conducted on 3rd october, 17. The event took off with racer boats taking the centre stage breezing through with their passes, saluting the crowd and were guided by the players who represented CoEP at national level. The show was carried forward by the Shell Games, Kayak Ballets and Telematches performances respectively, giving away the gist of the main event. SG's with their sculls, sweep rowers carried out their shapes elegantly, followed by the KB who deftly maneuvered through river giving out a thrilling show for the audience, majorly dominated by the freshers. Telematches also performed their five shapes with the help of canoe's, punts and a kayak. Red Bull, a regular attendee of Regatta was present to parcel cans to the participants as refreshments. After the river show, Boat Club Inauguration took place in the Mini-auditorium, co-ordinated by the BC, Regatta managing committee. Inauguration was marked by dignitaries such as S.L.Patil Sir,Dean student affairs, Pardeshi Sir, Vice President of Boat Club, Mahajan Sir, Meshram Sir and other Boat Club faculties and Staff members. S.L.Patil Sir gave his reiterated speech to start of the inauguration guiding students for another successful year, with this **year marking the pre centenarian decade (The 90th Regatta ). The show** concluded with a promo video of yesteryears regatta leaving the crowd awestruck. Finally, the theme 'World Peace' was revealed on which the upcoming event will be based on. To end, no doubt the teaser is out but the dictum, ' picture abhi baaki hai mere dost! ' shrilled throughout the event.

-Ninad S Parab

# Page no. 2

## हिस्ट्री प्रश्नमंजूषा स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

कॉलेज ऑफ इंजिनीरिंग , पुणे मधील एक वैविध्यपूर्ण क्लब म्हणून ओळख असलेल्या हिस्ट्री क्लबतर्फे दरवर्षी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते . प्रश्नमंजूषा स्पर्धा, व्याख्यानमाला यांच्यामार्फत विद्यार्थ्यांच्या मनात चालू घडामोडी, इतिहास विषयी रुची निर्माण केली जाते .

अशाच एका कार्यक्रमाचे म्हणजेच वार्षिक हिस्ट्री प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन हिस्ट्री क्लबने केले . दि. ९ ऑक्टोबर रोजी सिओइपीच्या मिनी ऑडिटोरियम मध्ये हिस्ट्री प्रश्नमंजूषा स्पर्धा पार पडली.स्पर्धेसाठी एकूण ५२ संघांनी सहभाग घेतला होता.प्रश्नमंजूषा स्पर्धा दोन भागात विभागण्यात आली होती .

पहिल्या भागाच्या सर्वसामान्य प्रश्नांच्या फेरीनंतर ६ संघ पुढच्या भागात खेळण्यासाठी पात्र ठरले . दुसऱ्या भागात प्रत्येक संघाला वेगळे प्रश्न विचारून स्पर्धेचे विजेते ठरवण्यात आले .अक्षय हटवार याने स्पर्धा जिंकून प्रथमस्थान पटकावले . तसेच यशवंत मुंडे व प्रशांत मरसकोल्हे दुसऱ्या स्थानावर आणि कृष्णा भराडिया व तेजस पाटील यांनी तिसरे स्थान मिळवले . विजेत्यांना भेटवस्तू आणि बक्षीस देऊन पुरस्कृत करण्यात आले

-पवन भांगे

## COEP Tales




-Manas Joshi

## Zest Inauguration

The Inauguration of Zest, the sports meet of CoEP, was held on 6th October. What was supposed to mark the start of the 5th best sports festival turned out to be somewhat flat probably due to the decision to hold the inauguration at the time when most of the people are studying, but we hope to see the amazing enthusiasm from students at the time of the sports festival in the next semester. The inauguration was made special by the presence of eminent dignitaries which were Kiran Gitte and Kavita Raut.

Kiran Gitte has done the IAS training from Mussorie. He highlighted the importance of sports in his studies and preparation. People were surprised to know that even in UPSC program, the profile of various candidates wereassessed carefully but highest importance is actually given to sports. He encouraged the students to not neglect sports and exercise in order to excel in college. He showed the importance of physical fitness in order to lead a healthy student life.Kavita Raut is an Commonwealth bronze medalistwho comes a humble beginning. Since her childhood she loved to run. Everyone laughed when she said she enthusiastically ran to even get the water from the well in her courtyard. Her interest in running caught the eye of a professional trainer. “I didn’t know that this day is going to change my life forever”, she said. We all listened to her inquisitively about how sports changed her life and taught her qualities like respect and patience. Later on, she talked about the decision of the state government of Maharashtra to give class one posts to distinguished sportsperson of various sports to raise their spirits of the people and encourage more participation of themin sports and make India a front runner in Olympics and other celebrated international and national events.

The inauguration also had a short speech by Nishad Dravid. He is a national level badminton player and also part of the proud alumni of our famed college. He lifted the spirits of us all and preached the idea of participation in sports alongside studies. Finally, all the heads introduced their respective portfolios and the promotion video was unveiled. The inauguration came to an end by the unveiling of the grand trophy. We all hope that the Zest is attended by a large number of colleges from various other states alongwith Maharashtra in the innumerable sportevents that are going to be held in those 3 days of the fest.



-Shabbir Khandwala

## स्पंदनने समाजासोबत विणलेले रक्ताचे नाते केले दृढ

रंगारंगांमध्ये जात-धर्म विभागले आहेत,परंतु लाल रंगाच जे रक्ताचं नात असत ते माणुसकीच नात जपण्याचा प्रयत्न सामाजिक उपक्रमात हिरीरीन सहभाग घेणाऱ्या सी ओ ई पी च्या स्पंदन क्लबतर्फे रक्तदानाच्या माध्यमातून करण्यात आला.

रक्तदान एक श्रेष्ठदान हे ब्रीद समोर ठेऊन विद्यार्थांना रक्तदानासाठी प्रेरित करण्यात आले आणि त्यास ४०७ विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दाखवून सामाजिक बांधिलकी जपली. सी ओ ई पी च्या मेन हॉलमध्ये ५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८:३० ते संध्याकाळी ७ पर्यंत ससून रुग्णालय आणि बी जे मेडिकल कॉलेज यांच्या सहयोगाने रक्तदान शिबिर स्पंदन क्लबतर्फे पार पाडण्यात आले. रक्तदात्यांची वजन आणि हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली.

रक्तदात्यांकडून स्वेच्छा पत्रावर स्वाक्षरी घेण्यात आली, तसेच रक्तदानानंतर त्यांना उपाहारही देण्यात आला. रक्तदात्यास स्पंदनतर्फे एक भेटवस्तू आणि ससून रुग्णालयातर्फे प्रमाणपत्र व पुणे सरकारी रक्तपेढीचे पिवळे कार्ड देण्यात आले.या कार्डमुळे त्यांना पुढील एक वर्षात एकदा मोफत रक्तपेढीचा लाभ घेता येईल. विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक वर्गानेही उपस्थिती दाखवली. जिमखाना उपाध्यक्ष श्री. पी. आर. धामणगावकर सर यांनी विशेष उपस्थिती दाखवून रक्तदान देखील केले व विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श उभा केला.

क्लबच्या सदस्यांकडून रक्तदात्यांची विशेष काळजी घेतली जात होती त्याचबरोबर मार्गदर्शनही करण्यात येत होते.अश्या रीतीने स्पंदनकडून उत्साहपूर्वक वातावरणात रक्तदानामार्फत भर घालण्याचा सुंदर प्रयत्न करण्यात आला.

-आदित्य वाळुंज

## Moon Light Punting

Kojagiri Pornima, the harvest festival celebrated on the full moon day of the Hindu lunar month of Ashwin, marking the end of the monsoon season. Moon Light Punting is being traditionally performed on this day. Generally, performed by the team which leaves the crowd most agog during the main event, 'Punt Formation'. Though this year all the teams participated and performed in this event. The main catch of the show was to cast moon's reflection on Mula river, by punts circumnavigating around to resemble lunar like image. The event began by 5.30pm with a few spectators, but= the paucity soon disappeared as the event progressed. The crowd was majorly dominated by our 'curious freshers', wanting to know more about the club which makes CoEP most unique. A few hindrances were caused by cloud cover but the boat club team volunteers smoothly maneuvered the crowd with fun games, charades keeping them well entertained and lit. Light refreshments with trademark kojagiri snack 'Masala dudh' were being served while summing up the show. On account of this festival, Boat Club Team paid their respects to the accessories, equipments while thanking god for their safety, success and wishing for another successful year ahead !! During prayers boys would have been easily caught secretly desiring to be the next 'Daftari' of boat club, while girls, I guess, ımm....,leave, were as usual difficult to infer on !!

The etymology of the name 'kojagiri' has its sanskrit derivation 'ko jaagrati' which literally means 'who is awake'. So, it is believed on this day Goddess Lakshmi moves around the earth under the full moon night, seeking those who are awake and praying with devotion, showering her blessings on them, of which our Team Regatta would definitely be on her list making the event even more spectacular and vivacious as ever!

-Ninad S Parab

# COEP Tales




## Children's day by spandan



## वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची अनेक पुस्तके विद्यार्थ्यांमध्ये अतिशय प्रसिद्ध आहेत. त्यांची पुस्तके सदैव प्रेरणादायी ठरली आहेत.त्यांच्या सन्मानार्थ त्यांची जयंती " राष्ट्रीय वाचन प्रेरणा दिवस ' म्हणून साजरी करण्याचा नवीन उपक्रम भारत सरकारने सुरू केला आहे. या दिनानिमित्त आपल्या महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'अभियंता' च्या सभासदांनी दि. 12 ऑक्टोबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमासाठी ज्ञानप्रबोधिनीच्या कार्यकर्त्या असणाऱ्या सौ. आरती देवगावकार यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

स्वत: एक वाचक, लेखिका, संपादिका, कवयित्री आणि वक्त्या असलेल्या आरतीजींनी आत्ताच्या जगात असणारे वाचनाचे आणि पुस्तकांचे महत्व आणि वाचनापासून परावृत्त होत चाललेली पिढी याविषयी आपले उत्तम मत मांडले. काय, कसे आणि किती वाचले पाहिजे याविषयी ऐकून विद्यार्थी भारावून गेले. लेखकाला वाचकांकडून असणाऱ्या अपेक्षा ऐकून विद्यार्थ्यांचा वाचनाबद्दल असणारा दृष्टीकोन नव्याने बदलला. यानंतर प्रश्नोत्तरांचे सत्र झाले.

आपल्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी शरयू बनकर हिने व. पु. काळे यांच्या दात है तो बात है या कथेचे सुंदर प्रकारे कथाकथन केले. या कथेतून ऐकणाऱ्याला हसवता हसवता उत्तम संदेश द्यायची वपुंची शैली स्पष्टपणे समोर येत होती. (जरूर वाचा.. महाविद्यालयीन युवकांवरची कथा ) कार्यक्रमाला अभियंताचे सभासद तसेच जिमखाना उपाध्यक्ष श्री पी आर धामणगावकर सर विद्यार्थी विभागाचे अधिष्ठाता श्री एस एल पाटील सर आणि जिमखाना सेक्रेटरी ऋतुजा बजागा व इतर मान्यवर उपस्थित होते.

एकंदरीत वाचन प्रेरणा दिवस उत्तमरित्या पार पडला.






-वैष्णवी हर्डीकर

## सी ओ ई पी स्पंदनने साजरा केला आदर्श बालदिन

विविध सामाजिक उपक्रमांमध्ये हिरीरीने सहभाग घेणाऱ्या सी ओ ई पी स्पंदन ने यावर्षी एक अनोखा उपक्रम राबवला. १४ नोव्हेंबर हा संपूर्ण देशभरात बाल दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून स्पंदनच्या सदस्यांनी लहान मुलांना बिस्कीट वाटप केले. प्रस्तुत वाटपीकरणासाठी स्पंदनच्या सदस्यांनी जंगली महाराज रोड निवडला व त्या रोड वर असणाऱ्या जवळ जवळ प्रत्येक छोट्या मुलाला बिस्कीट पुडा देण्यात आला. कोणत्याही प्रकारची औपचारिकता किंवा उदघाटन वगैरे न करता छोट्या मुलांच्या भूक या गरजेला प्रथम प्राधान्य देण्यात आले ही विशेष बाब.

बिस्कीट मिळाल्यानंतर मुलांच्या चेहऱ्यावरील आनंदच त्यांना वाटलेल्या भावना सांगून गेला.
केवळ पंडित नेहरूजींच्या तसबिरीला हार घालून बाल दिन साजरा न करता खऱ्या अर्थाने बालदिन जगलेल्या स्पंदनचे मन:पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा!

या निमित्ताने आपणही हा पण करू शकतो. कार चालवणाऱ्यांना सिग्नलवर गाडी थांबली की हा अनुभव नक्कीच येत असेल. चहूबाजूंनी दार ठोठावणारे चिमुकले हात दिसले की काच बंद ठेवून निघून जाणे यापेक्षा छोटे बिस्कीट पुडे आपल्या कारमध्ये ठेवून असे हात दिसले कि तेच त्यांच्या हातावर ठेवणे हासुद्धा चांगला पर्याय होऊ शकतोच की! शेवटी त्यांना तरी काय हवे असते? पैशापेक्षा त्यांची त्या दिवसाची एक वेळची का होईना भूक भागणं महत्त्वाचं. बघा विचार करून. इतकी समाजसेवा आपण नक्कीच करू शकतो.

-अंबरीश पत्की

## सी ओ ई पी तर्फे स्वच्छता रॅली चे आयोजन

२ ऑक्टोबर हा दिवस देशभरात गांधी जयंती म्हणून साजरा केला जातो. गांधी जयंती च्या निमित्ताने व स्वच्छ भारत अभियानामध्ये आपला खारीचा वाटा देण्यासाठी सी ओ ई पी कडून स्वच्छता पखवाडा साजरा करण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून स्वच्छता रॅली चे महाविद्यालयामध्ये आयोजन करण्यात आले होते.

सकाळी ७.३० च्या दरम्यान स्वच्छता राखण्याचा शपथविधी झाल्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या आवारामध्ये विभाजित करण्यात आले आणि संपूर्ण महाविद्यालयाची स्वच्छता करण्यात आली. या कार्यक्रमाला जिमखाना सचिव ऋतुजा बजागा तसेच जिमखाना अंतर्गत सर्व क्लबस चे सचिव उपस्थित होते. कार्यक्रम जिमखाना उपाध्यक्ष श्री पी आर धामणगावकर सरांच्या देखरेखीखाली सुरळीतपणे पार पडला. कार्यक्रमानंतर उपस्थित विद्यार्थ्यांनी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.

-दुर्गेश भदाणे

## Spic macay तर्फे भरतनाट्यम प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

सी ओ ई पी मधील एक क्लासिक क्लब अशी ओळख असलेल्या spic macay ने मधील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय शास्त्रीय संगीत व कला तसेच संस्कृतीबद्दल जागृती वाढावी म्हणून नेहमीच शास्त्रीय संगीताच्या व नृत्याच्या मैफिली आणि व्याख्याने तसेच कार्यशाळा यांसारख्या विविध उपक्रमांचे आयोजन गेली अनेक वर्षे केले आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून स्पीच मचय तर्फे मधील विद्यार्थ्यांना भरतनाट्यम या नृत्य प्रकाराची ओळख व्हावी याकरिता ५ ते १० ऑक्टोबर दरम्यान अकॅडेमिक कॉम्प्लेक्स मध्ये निःशुल्क भरतनाट्यम प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरास चेन्नईच्या सुप्रसिद्ध भरतनाट्यम नर्तिका विदुषी श्वेता प्रचंडे यांचे मार्गदर्शन लाभले. पाच दिवस चाललेल्या या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना भरतनाट्यम च्या विविधांगी पैलूंची ओळख झाली. सुमारे चाळीस हून अधिक विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षण शिबिराचा भाग घेऊन भरतनाट्यम चे नृत्य कौशल्य संपादन केले.

-अनिकेत लाटकर

*Abhijaat wishes you all the best for your End Semester Examinations !*

## आर्य रास मंडळातर्फे शारदीय नवरात्रोत्सव २०१७ चे हर्षपूर्ण आयोजन

भारतीय परंपरेनुसार यंदाचा नवरात्रोत्सव दि.२१ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर ह्या कालावधीत होता परंतु महाविद्यालयाचा 'शारदीय नवरात्रोत्सव २०१७' यंदा ६ दिवस म्हणजेच दि.२४ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर दरम्यान आयोजिला होता.दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी देखील आर्य रास मंडळ तर्फे हा उत्सव महाविद्यालयाच्या मैदानावर दररोज सं. ६.३० ते रा. ९.३० आयोजित झाला.२४ सप्टेंबर सं. ७ वाजता दुर्गा देवीच्या प्रार्थने बरोबरच गरबा व दांडिया खेळून उत्सवाची सुरुवात झाली.माईंड स्पार्क चा शेवटचा दिवस असून देखील सुरुवात थाटामाटात झाली हे विशेष.

सर्व उत्साही विद्यार्थी व प्राध्यापक वर्गाने ६ दिवस पारंपरिक वेशभूषेत उत्सवाचा आनंद लुटला.महाविद्यालयाच्या सर्व प्रशिक्षक व कर्मचाऱ्यांना सहकुटुंब उत्सव अनुभवण्यास निमंत्रित केलं होतं.उत्सवाचा माहोल आनंददायी बनवण्यासाठी कार्यक्रम आवारात पाणीपुरी,मिसळपाव,सरबत अशे गाडे उभे करण्यात आले होते.विद्यार्थ्यांच्या शिस्तबध्दतेत आनंद, उत्तम आवेशात एखादी परंपरा व संस्कृती साजरी होण्याचं उत्तम उदाहरण हे यंदाचा शारदीय नवरात्रोत्सव ठरला.

पिझ्झा कॉर्नर, गजानन मिसळ हाऊस, जळगाव केळी चिप्स, सिटी लूक्स युनिसेक्स सलून, नयन ऑप्टिकल्स व साई केटरर्स हे ह्या उत्सवाचे प्रायोजक होते.प्रत्येक वर्षाच्या विद्यार्थ्यांना एक दिवस राखीव ठेवण्यात आला होता व सर्वोत्तम नृत्य आणि सर्वोत्तम वेशभूषेची विशेष बक्षिसे दररोज आयोजित केली होती.आर्य रास मंडळाचे सभासद, प्रशिक्षक सल्लागार अमृता देशपांडे व सर्व प्राध्यापकांच्या कष्टामुळेच हा उत्सव यशस्वी ठरला.

आर्य रास 'स्त्री सक्षमीकरण' ह्या धोरणावर मुलींद्वारे चालणारं एकमेव मंडळ आहे, ही कौतुकाची बाब आहे.

-पद्मेश कुलकर्णी

## Once a Techie, Always a Techie

Apart from nailing down every extracurricular discipline, COEP never forgets its generic duty to astound the world in the field of technology. In the golden era of Automation, constantly developing information/artificial intelligence technology has provided traditional manufacturing industry transformation with powerful force for change and technical guarantee. Thus, to bring in a platform where engineering grads can prove their mettle pertaining to manufacturing, Mitsubishi Electric Cup is back this year featuring in its 3rd edition with the revamped theme of "Innovative Solutions for Smart Manufacturing".

This National level competition marked its inception 2 years ago, where the latest edition was hosted by our very own college. To concise the event's format and rules - maximum two proposals can be sent by a College which must be solely devised by Undergrad or Postgrads. Ultimately, 35 teams from overall India are selected and cruise into the All India Finals where they have to showcase the entire working model which they proposed wherein Mitsubishi bears the entire financing of the project.

As leaving an indelible mark in every competition has been the forte of COEP and doing complete justice to the statement above has never ever been a Cake Walk but still due to tireless efforts of our students, we have maintained the legacy to be intact. Yet another proof is the "Team Automaters", who have come amongst the Top 35 in India and have qualified for the All India Finals which will be held in Nirma Institute of Technology, Ahmedabad. Their project's name was "Automated Cloth Bag Maker", the function being pretty much self-explanatory by its name. It prominently functioned on the detailed fundamentals and intricacies of Automation. It's due to their robust design and meticulous research; they are the only team from COEP qualifying for the National finals. The dream team comprises of GauravAdhikari, ManmitTawte, AdityaSaxena and ShreyasKumath. All of them are presently in TY Instrumentation. So for the matter of bragging, all Instrumentation folks can go crazy.

All India Finals will be held in the month of February where we fervently hope that our "Team Automaters" will be able to incorporate everything into the model they intend to. Andeventually, culminate their model into a state of the art technology. We, theAbhijaat team on behalf of entire COEP community wish you luck for the Finals along with many future endeavors. Carpe Diem people!!!

-Himanshu Shukla

## बोट क्लब तर्फे निर्माल्य एकत्रीकरणाचा कार्यक्रम

सीओईपी चा ऐतिहासिक वारसा असलेल्या Boat क्लब च्या माध्यमातून सन २००६ पासून दरवर्षी Boat क्लब व्यवस्थापकीय समिती, जलमैत्री समन्वयक यांच्याकडून समाजसेवेच्या जाणिवेतून पर्यावरण रक्षणासाठी सार्वजनिक गणेशोत्सवात गणेश विसर्जनावेळी नदीत टाकण्यात येणारे निर्माल्य गोळा केले जाते.

सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये प्रथेनुसार दीड, पाच व सात दिवसांनी आणि अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जन केले जाते. Boat क्लब चे सचिव आदित्य पितळेने दिलेल्या आकडेवारीनुसार यंदाच्या वर्षी गणेशोत्सवाच्या २ऱ्या दिवशी, २६ ऑगस्ट रोजी ६.७ किलो. निर्माल्य गोळा करण्यात आले. त्यापाठोपाठ ५व्या व ७व्या दिवशी अनुक्रमे १६.२ किलो व ५७.५ किलो निर्माल्य गोळा केले गेले. ५ सप्टेंबर रोजी म्हणजे अनंत चतुर्दशीच्या दिवशी ७२१.७ किलो एवढे निर्माल्य गोळा करण्यात आले. गेल्या १० वर्षांमधील सर्वात जास्त तब्बल ८ क्विंटल निर्माल्य या वर्षी गोळा करण्यात आले, अशी माहिती Boat क्लब चे श्री.राजु मामा यांनी त्यांच्याशी बोलताना दिली.

लोकांना नदी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध फलक Boat क्लब आवारात लावण्यात आले होते. Boat क्लब व Regatta व्यवस्थापकीय समिती तसेच द्वितीय वर्षाच्या जवळपास ४०हून अधिक स्वयंसेवकांनी स्वतःहून सहभाग नोंदवून विद्यार्थीदशेमध्ये असतानासुद्धा सामाजिकता कशी जपावी याचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. सीओईपी Boat क्लब च्या जलमैत्री परिवारातर्फे दरवर्षी नदी स्वच्छता मोहीम, जलमैत्री Water Camp असे विविध सामाजिक व पर्यावरण पूरक उपक्रम राबवले जातात.असे जलमैत्री समन्वयक अक्षय पवारने सांगितले. अशा स्तुत्य उपक्रमांसाठी जलमैत्री व Boat क्लब परिवारास शुभेच्छा!

-वेदांग कोतकर

## The Astronomy Club

The astronomy club quenches the loads of curiosity of unveiling the secrets of the universe that are burried in the blizzards of ignorance.- To achieve this goal and keep the fire of curiosity burning in the young hearts, this club conducts weekly meetings, guest lectures, etc. Star Parties are organized with great zeal and enthusiasm, where students get to observe the stars and thus get to demystify the mystery. The star parties are arranged when the crescent moon fails to lift the darkness of the night and thus the stars perform their duty to the best of their ability.

Meteor shower observation, messeir marathons which were organized had etched the minds of the young.To put the understanding and knowledge of this ever expanding and mysterious world of universe, quiztornomy is conducted. Students who are astonished by the glimpses of the universe captured through the art of photography, this is a perfect place to be as astrophotography forms the core of this club.This club is always on its toes to improve itself and give students an enriching experience. With this motive in mind, it has undertaken a project of automating a telescope, conducting outreach programs to teach students.

To ignite the celestial light of this mystical world, guest lecture was organized as an introduction to the club by Dr. Kshitija Deshpande who is an assistant professor at embrry riddle, TheUniversity of Florida. She gave her insights on GPS Positioning and deployment of instrument in Antarctica.This club is committed to achieve its goals and set new milestones with great deal of hard work, grit and determination of the students.

-Aneri Desai